महाराष्ट्र टाइम्स, कोल्हापूर ■ शुक्रवार, १५ सप्टेंबर २०१७

# प्लास्टिकमुक्ती करण्यासाठी सक्ती हाच मार्ग

## वेंगुर्ला नगरपरिषदेचे मुख्याधिकारी कोकरे यांचे मत

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

अमित गद्रे



आठव्या किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला कोल्हापुरातील शाहू स्मारक भवन येथे गुरुवारपासून सुरुवात झाली. महोत्सवाचे उद्घाटन करताना रामदास कोकरे. डावीकडून किर्लोस्कर कंपनीचे चंद्रहास रानडे, व्हाइस प्रेसिडेंट कृष्णा गावडे, निसर्गमित्र संस्थेचे अनिल चौगुले, डॉ. कुणाल खेमनार, वीरेंद्र चित्राव व प्राचार्य महादेव नरके आदी.

'समाजाचे स्वास्थ्य धोक्यात आणणाऱ्या प्लास्टिकचा भस्मासूर नष्ट करण्यासाठी आता सौजन्याचा नव्हे तर सक्तीचाच मार्ग अवलंबण्याची गरज आहे. दैनंदिन व व्यावहारिक जीवनातील प्लास्टिकच्या बंदी मोहिमेत, तांत्रिक किंवा प्रशासकीय यंत्रणेपेक्षा लोकांची मानसिकता हाच सर्वांत मोठा अडथळा आहे' असे परखड मत वेंगुर्ला नगरपरिषदेचे मुख्याधिकारी रामदास कोकरे यांनी व्यक्त केले. गुरुवारी शाहू स्मारक भवनात आठव्या किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या उदघाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुणाल खेमनार होते. 'नदी वाचवा जीवन वाचवा' या संकल्पनेवर बेतलेल्या या चित्रपट महोत्सवात चार दिवसात ३५ सिनेमे दाखवण्यात येणार आहेत. १७ सप्टेंबरपर्यंत हा महोत्सव सुरू असलेला महोत्सव टेंपल ऑफ दि टायगर्स सिनेमाने सुरू झाला.

लोकसहभागातून स्वच्छ वेंगुर्ला पॅटर्न यशस्वी करणाऱ्या कोकरे यांनी यावेळी अनुभव मांडले. कोकरे म्हणाले, 'मायक्रोनच्या निकषांना रद्द करून पूर्णपणे प्लास्टिक पिशव्या बंद झाल्या पाहिजेत. घनकचऱ्यात प्लास्टिकचे प्रमाण २० टक्के असल्याचे पाहणीमध्ये दिसून आले आहे. जागतिक स्तरावर प्लास्टिकवर कर लागू आहे. तसेच नाले तुंबण्यात प्लास्टिकचा हातभार असल्याचे लक्षात आल्यानंतर काही देशांमध्ये प्लास्टिक वापरणाऱ्यांवर दंड आकारला जात आहे. महासागरातही प्लास्टिक पिशव्यांमुळे जलचरांना धोका निर्माण होत आहे. पक्ष्यांच्या विष्ठेत ९ टक्के प्लास्टिक आढळून आले आहे. प्लास्टिकमुळे जैवविविधता धोक्यात आली आहे. याचा विचार समाजातील प्रत्येक घटकाने केला पाहिजे. प्लास्टिक वापराबाबत समाजाचा 'मेंटल ब्लॉक' घनकचऱ्याच्या व्यवस्थापनातील प्रयोगांना खीळ घालणारा आहे.'

### किर्लोस्कर वसुंधरा महोत्सव

कोकरे म्हणाले, 'नदी प्रदूषणाबाबतही समाज गंभीर नाही. प्रदूषित नद्यांमुळेच मानवाचा ऱ्हास होत आहे. कचऱ्यातील प्लास्टिक समूळ नष्ट करण्यासाठी प्लास्टिक वापर, निर्मितीवर पूर्णपणे बंदीसाठी नागरीक, प्रशासन आणि उत्पादकांच्या समन्वयातूनच पाऊल टाकले पाहिजे.'

अध्यक्षीय भाषणात डॉ. खेमनार म्हणाले, 'नदी वाहती असली पाहिजे. मात्र मानवाने सोयीसाठी बांधलेले बंधारे आणि साठलेल्या पाण्यातील प्रदूषण ही गंभीर समस्या बनली आहे. पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी प्रत्येकाची आहे. कचरा आणि सांडपाणी याच्या निर्गतीबाबत घराघरातून सहकार्य मिळाले तर कचऱ्यातून खतनिर्मितीसारखे प्रयोग राबवणे अवघड नाही.'

किर्लोस्कर कंपनीचे प्लँट हेड चंद्रहास रानडे यांनी प्रास्ताविक केले. व्हाइस प्रेसिडेंट कृष्णा गावडे यांनी स्वागत केले. महोत्सवाचे संचालक वीरेंद्र चित्राव, समन्वयक व निसर्गमित्र संस्थेचे अनिल चौगुले, पर्यावरण अभ्यासक उदय गायकवाड, प्राचार्य महादेव नरके आदी व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी सँड आर्ट फिल्म सादर करण्यात आली. कोकरे यांनी वेंगुर्ल्यात राबवलेल्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाची चित्रफीत दाखवण्यात आली.

### पर्यावरणस्नेही सजावट

महोत्सवात मांडलेल्या पर्यावरण संवर्धन विचाराची नांदी कार्यक्रमस्थळी प्रवेशद्वारापासूनच सजावटीच्या माध्यमातून करण्यात आली. दळवीज आर्ट इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांच्या युनाते क्रिएशन या ग्रुपतर्फे नैसर्गिक वस्तू, वनस्पतींच्या कमानी, कागदी पताका यापासून पर्यावरणस्नेही सजावट केली. या सजावटीच्या पार्श्वभूमीवर अनेकांनी सेल्फी क्लिक केली.

### आज पुरस्कारांचे वितरण

महोत्सवानिमित्त देण्यात येणाऱ्या वसुंधरा मित्र, वसुंधरा गौरव पुरस्कार आज (शुक्रवारी) जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी इंद्रजित देशमुख यांच्या हस्ते देण्यात येणार आहेत. अनिल बडदारे, रणजित माजगावकर यांच्यासह एन्व्हायरो लीगल फोरम या संस्थेला वसुंधरा मित्र पुरस्काराने गौरवण्यात येणार आहेत. तर विश्वास बालिघाटे, बाळगोंडा पाटील, लहू मोरे यांना वसुंधरा गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

### आजचे लघुसिनेमे

शुक्रवारी महोत्सवात अॅडप्ट, अॅडोप्ट अँड सर्व्हाइव्ह, अरमर, पॅराडाइज फाउंड, रिव्हर रेज्युव्हेनेशन, बाल पांड्ये... अ लाइफ ऑफ बर्डस, व्हेन दि पिकॉक सिंग आणि दि अँग्री रिव्हर हे लघुसिनेमे दाखवण्यात येणार आहेत.

### छायाचित्र प्रदर्शनाला प्रतिसाद

महोत्सवाचे उदघाटन रामदास कोकरे, अध्यक्ष डॉ. कुणाल खेमनार यांच्या हस्ते महोत्सवांतर्गत घेण्यात आलेल्या छायाचित्र स्पर्धेतील छायाचित्र प्रदर्शनाच्या उदघाटनाने झाले. कलादालन येथे हे प्रदर्शन सुरू आहे.